खंडाळा विभाग शिक्षण समिती संचालित,

# सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय खंडाळा

## भूगोल विभाग

# "कन्हेरी गावातील लोकसंख्येचा अभ्यास"

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यार्थ्याचे नाव : पवार भाग्यश्री अनंत

बी.ए.भाग 3

रोल नं : 17 परीक्षा नं : 17

## मार्गदर्शक

प्रा. पडळकर एस. व्ही.

प्रा. मोधे ए. पी.

प्रकल्पाचे वर्ष : 2019 ते 2020

# अनुक्रमणिका



| अ.नं. | शीर्षक | पान नं. |
|---|---|---|
| 1 | प्रमाणपत्र | |
| 2 | ऋणनिर्देश | |
| 3 | सर्वेक्षणाची भौगोलिक पार्श्वभूमी | |
| 4 | आराखडा | |
| 5 | अभ्यास क्षेत्र | |
| 6 | लोकसंख्या | |
| 7 | समस्या | |
| 8 | उपाय | |
| 9 | निष्कर्ष | |
| 10 | संदर्भ सूची | |

KHANDALA VIBHAG SHIKSHAN SAMITI'S

# SUSHILA SHANKARRAO GADHAVE MAHAVIDYALAYA KHANDALA

Khandala Vibhag Shikshan Samiti

SUSHILA SHANKARRAO GADHAVE MAHAVIDYALAYA

## Department Of Geography

# CERTIFICATE

**Exam Seat No :**

This is Certify that Miss/Mr. Pawar Bhagyashri Ahan... B.A.III class has satisfactory completed Journal/Survey Report/Tour Report as per academic year of 2019-2020 as this report represent his/her bonafide work.

Place : Khandala

Date :

Sub Incharge | Examiner | Head Of Department

# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. भाग 3 भूगोल (स्पेशल) या विषयाच्या सन 2019-2020 या शैक्षणिक वर्षापासून बदललेल्या नवीन सुधारित अभ्यासक्रमानुसार खंडाळा विभाग शिक्षण समिती संचलित , सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय खंडाळा ता. खंडाळा जि. सातारा येथील भूगोल विभागाने आयोजित केलेल्या कन्हेरी ता. खंडाळा येथील ग्रामसर्वेक्षणाचा अहवाल सादर करताना मला फार आनंद होत आहे.

आज जगातील विविध प्रदेशात अनेक प्रकारच्या समस्या तेथील वास्तव्य करणाऱ्या लोकांना भेडसावतात. उदा. नैसर्गिक आपत्तीच्या समस्या , प्रदूषण , नागरी समस्या , लोकसंख्या वाढ इ. महाराष्ट्रात लोकसंख्या वाढीबरोबरच अनेक समस्यांना लोकांना तोंड दयावे लागत आहे. कन्हेरी येथील लोकांच्या समस्या तसेच अडचणी जाणून घेण्यासाठी आम्ही कन्हेरी ता. खंडाळा जि. सातारा येथील ग्रामसर्वेक्षण यशस्वी केले. या सर्वेक्षणासाठी आम्हाला प्राचार्य डॉ. संभाजी बामणे यांची प्रेरणा मिळाली त्यामुळे मी त्यांची आभारी आहे.

भूगोल विभागाच्या प्रा.पडळकर सुजाता व प्रा. मोधे अंकुश यांचे ग्रामसर्वेक्षणात व अहवाल लिखाण कार्यासाठी सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करते.तसेच प्रा. खवळे जी.एस. यांचे सुध्दा वेळेवेळी सर्वेक्षणासाठी सहकार्य लाभले. त्याबद्दल त्यांचे ही मी आभार मानते.

लोकसंख्या सर्वेक्षण अहवाल लिहिताना आमचे गटप्रतिनिधी यांचे सहकार्य लाभले तसेच सर्वेक्षणात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहाय्य केल्याबद्दल कन्हेरी येथील ग्रामसेवक,सरपंच व ग्रामस्थ यांचे ही मनपूर्वक आभार.


## प्रकरण पहिले : सर्वेक्षणाची भौगोलिक पार्श्वभूमी

### ग्रामसर्वेक्षणाचे महत्व :

भूगोल विषयात क्षेत्र अभ्यासाला अनन्य साधारण महत्व आहे. गावाच्या विकासावर परिणाम करणाऱ्या नैसर्गिक घटकांचा अभ्यास आर्थिक समस्या , सामाजिक समस्या यांचा अभ्यास फक्त पुस्तकातच होत असतो. विविध प्रदेशांचा अभ्यास केल्यास तेथील मानवी जीवन व भौतिक पर्यावरणाचा सहसंबंध अनुकूल तर काही ठिकाणी प्रतिकूल असतो. तरी सुद्धा मानव त्या परिस्थितीशी मिळते जुळते घेतो. आपला जीवनक्रम समजण्यासाठी भूगोलाच्या अभ्यासात सर्वेक्षण अभ्यासाला फारच महत्व आहे. सर्वेक्षण अभ्यासात भुपृष्ठावरील नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांच्या निरीक्षणाचा अभ्यास होतो. त्यामुळे भूगोलाच्या विद्यार्थ्यांना भौगोलिक परिस्थिती व मानवी जीवन यांचा संबंध स्पष्ट करणे आवश्यक आहे. सर्वेक्षण संबंधित खेडयात गेल्याशिवाय त्याला सर्वेक्षणाचा सहसंबंध स्पष्ट करता येत नाही. त्यामुळे सर्वेक्षणाला खेडयात जाऊन विविध माहिती मिळवण्यासाठी सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.

खंडाळा तालुक्यातील कन्हेरी या ठिकाणी ग्रामसर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणाचा अभ्यास करताना आर्थिक , सामाजिक , शैक्षणिक , लोकसंख्या, गावपातळीवरील समस्या , जन्मदर व मृत्युदर व त्यामध्ये आढळणारी अभिक्षेत्रीय भिन्नता यांमध्ये असणारा कार्यकारण संबंध शोधुन काढण्याचा प्रयत्न केला जातो. ग्रामसर्वेक्षणात राजकीय परिस्थितीचा ही अभ्यास अंतर्भूत करण्यात येतो. म्हणूनच भूगोलाच्या अभ्यासात ग्रामसर्वेक्षणाला अनन्य साधारण महत्व आहे.

# आराखडा




## कन्हेरी गावठाण आराखडा

## स्थान

### सर्वेक्षण गाव , व कन्हेरीचे स्थान :

आम्ही सर्वेक्षणास निवडलेल्या गावाचे स्थान हे सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यात बसले आहे. कन्हेरी हे सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील एक गाव आहे. ते पश्चिम महाराष्ट्र विभागातील आहे. कन्हेरी हे गाव साताऱ्यापासून उत्तरेकडे 48 कि. मी. अंतरावर आहे. खंडाळा येथून 13 कि.मी. आहे. कन्हेरीपासून जवळे 2 कि. मी., लिंबाची वाडी 2 कि. मी., झगलवाडी 2 कि. मी.असवली 3 कि. मी.ही जवळची गावे आहेत.

वाई , महाबळेश्वर , भोर , सासवड , सातारा ही कन्हेरी जवळील शहरे आहेत. या गावात असणारी समता , बंधुता , प्रेम यांमुळे हे गाव इतर गावांहून वेगळे वाटते. गावातील एकमेव मस्जिद, हनुमान मंदिर, श्रीराम मंदिर एकाच ओळीत आहेत. कन्हेरी हे गाव खूप प्राचीन आहे.



## प्रकरण दुसरे : अभ्यास क्षेत्र

सह्याद्री डोंगर रांगांचा वारसा लाभलेल्या कन्हेरी गावाची समुद्रसपाटीपासूनची उंची 615 मी. आहे. खंडाळा तालुक्यातील खंडाळा पासून 13 कि. मी अंतरावर कन्हेरी हे गाव आहे. गावाची लोकसंख्या सन 2011 मध्ये 1830 इतकी असून पुरुषांची संख्या 936 व स्त्रियांची संख्या 894 इतकी असून घरांची संख्या 468 आहे. कन्हेरी गावाचे एकूण क्षेत्रफळ 1282.29 हेक्टर इतके आहे. एकूण क्षेत्रफळापैकी भूखंडाखाली 25672 चौ.मी. खुली जागेचे क्षेत्रफळ 4811 चौ .मी. त्याचप्रमाणे समाजमंदिर, प्राथमिक शाळा, चावडी , बालवाडी व बसस्थानकासाठी उर्वरित क्षेत्र आहेत. कन्हेरी मध्ये सर्वेक्षण करताना खालील गोष्टी साध्य करण्यात आलेल्या आहेत.

1. निसर्गाचा समतोल साधणे.
2. आपापसात सुसंवाद साधणे .
3. गुटखा बंदी , दारू बंदी इ .गावातील व्यसनातील खर्च .
4. कुटुंब नियोजनात सहभाग .
5. पाणी व्यवस्थापन, शुद्ध पाणी पुरवठा, सांडपाण्याचा परस बागेसाठी वापर.
6. घर तिथे शौचालय सार्वजनिक वापर.
7. शेती समस्यावरील उपाय .
8. सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग.
9. निर्मल ग्राम व व्यसनमुक्त गाव.
10. गावच्या यात्रेवेळी सामाजिक एकोपा निर्माण करणे .

## ग्रामसर्वेक्षणाची उद्दिष्टे:

लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची महत्वाची उपशाखा आहे. लोकसंख्या भूगोलाचे गतिमान स्वरूप आणि काळाची गरज लक्षात घेऊन बी.ए. भाग 3 पेपर नंबर 14 मध्ये ग्राम सर्वेक्षण अभ्यासक्रमात घेण्यात आले. गावपातळीवरील अनेक समस्यांचा अभ्यास सर्वेक्षणात करण्यात आला. त्यानुसार खालील उद्दिष्ट्यांना अनुसरून कन्हेरी गावाचे सर्वेक्षण करण्यात आले.

1. गावातील कुटुंबे व कुटुंबातील एकूण सदस्य संख्या अभ्यासणे.
2. कन्हेरी गावातील शैक्षणिक सोयीचा अभ्यास करणे.
3. कुटुंबातील सुखसोयीचा अभ्यास करणे.
4. गावातील साक्षरतेची पातळी अभ्यासणे.
5. येथील ग्रामसमस्या भविष्यकालीन योजना अभ्यासणे गावातील लोकांच्या शेतीविषयक अभ्यास करणे.
6. व्यवसाय संरचना अभ्यासणे.
7. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अभ्यासणे.
8. गावातील लिंग गुणोत्तर अभ्यासणे.
9. लोकसंख्येच्या वयोरचनेचा अभ्यास करणे.
10. गावातील सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
11. समस्या वरील उपाय योजना सुचविणे.पाणी पुरवठयांचा अभ्यास करणे.

## ग्रामसर्वेक्षणाच्या अभ्यास पद्धती :

कन्हेरी गावाच्या सर्वेक्षण उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी माहिती गोळा करताना पुढील अभ्यास पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

**अ) प्राथमिक माहिती :**

सर्वेक्षणात माहिती गोळा करण्यासाठी भूगोल विभागाने तयार केलेल्या प्रश्नावलीच्या आधारे प्रत्येक कुटुंबाच्या घरी जाऊन मुलाखती घेण्यात आल्या. त्याद्वारे वरील उद्दिष्टांना अनुसरून माहितीचे संकलन करण्यात आले.

**ब) द्वितीय माहिती :**

कन्हेरी गावातील केलेले सर्वेक्षण कन्हेरी ग्राम विकास कमिटी कार्यालय , ग्रामपंचायत सदस्य, इंटरनेट इ. मार्फत आवश्यक असणारी द्वितीय स्वरूपाची माहिती सांख्यिकीय स्वरुपात मिळवण्यात आली.

## प्रकरण तिसरे : लोकसंख्या

### लोकसंख्या अभ्यास :

कन्हेरी हे गाव सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यात वसलेले आहे. या गावात एकूण 468 कुटुंबे असून गावची सन 2011 मधील लोकसंख्या 1830 इतकी आहे. त्यातील 936 पुरुष व 894 स्त्रिया आहेत. या गावातील जास्तीत जास्त लोक हिंदू मराठा , मुस्लिम या समाजातील आहेत.या गावामध्ये बहुतांश लोक शेती व्यवसाय करतात. तर काही लोक शेत-मजुरी व नोकरी करतात. गावामध्ये जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आहे. तसेच माध्यमिक विद्यालय आहे. गटारे दळणवळण , पिण्याच्या पाण्यासाठी प्रादेशिक नळपाणी पुरवठा आहे. या गावचा आर्थिक व्यवहार शिरवळ व खंडाळा या शहरावर अवलंबून आहे.

### धर्म जात व भाषा :

कन्हेरी गावातील शैक्षणिक आढावा घेण्याच्या उद्देशाने केलेल्या सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीवरून जास्तीत जास्त लोक मराठा व मुस्लिम समाजातील आहेत. या गावात सर्व लोक मराठी भाषा बोलतात. या गावची लोकसंख्या 1830 आहे. या गावात सर्व जातीधर्माचे लोक राहतात. या गावाचे वैशिष्ट्य म्हणजे या गावात मस्जिद, हनुमान मंदिर, श्रीराम मंदिर एकाच ओळीत आहेत.या गावात वास्तविक बंधुता व समानता आढळून येते.


## लोकसंख्या वाढ :

भारताच्या सन 2011 मधील जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 121 कोटीपेक्षा अधिक होती. महाराष्ट्राची **11,23,72,972** लोकसंख्या होती. लोकसंख्येच्या दृष्टीने महाराष्ट्राचा भारतात दूसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या दरावर नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांचा परिणाम होतो. उदा. हवामान , दरडोई उत्पन्न , नागरिकीकरण इ.

सन 2011 मधील जनगणनेनुसार कन्हेरी गावाची लोकसंख्या 1830 इतकी असून पुरूषांचे प्रमाण स्त्रियांपेक्षा जास्त आहे.


कन्हेरी लोकसंख्या तक्ता

| अ.न. | वर्ष | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | सन 2011 | 936 | 894 | 1830 |



## कन्हेरी गावातील लिंग- गुणोत्तर तक्ता :


| अ.न. | वय | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | 0 ते 5 | 30 | 35 | 65 |
| 2 | 6 ते 14 | 100 | 110 | 210 |
| 3 | 15 ते 34 | 210 | 190 | 400 |
| 4 | 35 ते 59 | 396 | 360 | 756 |
| 5 | 60 पेक्षा जास्त | 200 | 199 | 399 |
| | एकूण | 936 | 894 | 1830 |



## व्यवसाय संरचना :

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाची अवस्था ही त्या देशातील काम करणाऱ्या लोकसंख्येची विविध व्यवसायात कशा पद्धतीने विभागणी झालेली आहे याचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते. कन्हेरी गावातील व्यवसाय संरचनेचे पुढील पाच गटात वर्गीकरण केले आहे. 15 वर्षाखालील बालकांचा आणि 60 वर्षाखालील वृद्धांचा कार्यकारी लोकसंख्येत समावेश करण्यात आला नाही.

| अ.न. | प्राथमिक व्यवसाय | | द्वितीय व्यवसाय | तृतीय व्यवसाय | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शेती | मजुरी | नोकरी | व्यवसाय | उद्योगधंदे |
| पुरुष | 350 | 152 | 230 | 36 | 32 |
| टक्केवारी | 43.75% | 19% | 28.75% | 4.5% | 4% |




वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, 43.75% लोक हे प्राथमिक व्यवसायावर अवलंबून आहेत. 28.75% लोक हे नोकरीवर अवलंबून आहेत. 4.5 % लोक हे व्यवसाय व 4% लोक हे उद्योगधंदयावर अवलंबून आहेत.

## आर्थिक संरचना :

आम्ही भेट दिलेल्या कन्हेरी या गावाच्या लोकसंख्येच्या संरचनेचा अभ्यास करताना आर्थिक संरचना घटकांचा अभ्यास करावा लागतो. आर्थिक संरचनेच्या अभ्यासातून उत्पन्नाची पातळी व दर्जा समजतो. आर्थिक संरचना तक्ता पुढीलप्रमाणे...

**आर्थिक संरचना तक्ता:**

| अ.न. | वार्षिक उत्पन्न | कुटुंबांची संख्या |
|---|---|---|
| 1 | 5000 रु. पेक्षा जास्त | 20 |
| 2 | 5000 ते 10000 रु. | 66 |
| 3 | 10000 ते 20000 रु. | 74 |
| 4 | 20000 ते 30000 रु. | 93 |
| 5 | 30000 ते 40000 रु. | 95 |
| 6 | 40000 ते 50000 रु. | 59 |
| 7 | 50000 रु.पेक्षा जास्त | 61 |
| | एकूण | 468 |




साधा स्तंभालेख (वार्षिक उत्पन्न गटानुसार )

## शैक्षणिक आढावा : अभ्यास

पूर्वीच्या काळी शिक्षण हे उच्चवर्णीय लोकांनी घ्यायचे अशी पद्धत होती. कालांतराने त्यात बदल होऊन शिक्षण हे सर्व तळागाळातील लोकांसाठी असावे असा ठराव महात्मा फुले यांनी हंटर आयोगापुढे मांडला. त्यानुसार प्राथमिक शिक्षण सर्व मुलांसाठी खुले झाले पण स्त्रियांना मात्र शिक्षणाची दारे बंद होती. चूल व मूल हेच स्त्रीयांचे कार्यक्षेत्र मानले होते. याच पारंपारिक विचाराच्या समाजात जुन्या व भुरसटलेल्या विचारांचे जोखड जर फेकून द्यायचे असेल म्हणजेच समाज सुधारायचा असेल तर प्रथम स्त्री शिकली पाहिजे हे महात्मा फुले यांनी ओळखले व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिकवले. कन्हेरी हे गाव शैक्षणिकदृष्ट्या सुधारलेले असून गावात पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या कमी आहे. कन्हेरी गावात जि. प. शाळा तसेच माध्यमिक विद्यालय आहे. सर्वेक्षणातून या गावातील शैक्षणिक स्तर पुढीलप्रमाणे स्पष्ट होतो.

| शैक्षणिक स्तर | मुले / पुरुष | मुली / स्त्री | एकूण |
|---|---|---|---|
| 1 ली ते 10 वी | 150 | 120 | 270 |

## कन्हेरी गावातील शैक्षणिक समस्या

**1) मुलांची गैरहजेरी :**

कन्हेरी मध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळा असूनही काही मुले शाळेत जात नाहीत कारण घरातील कामे, परिस्थिती यामुळे काही मुलांना शाळेत जाता येत नाही.

**2) आर्थिक परिस्थिती :**

कन्हेरी गावामध्ये काही ठिकाणी गरीब परिस्थितीमुळे काही मुलांना शाळेत जाता येत नाही.

**3) स्थगिती :**

कन्हेरी गावामधील सर्वेक्षणात असे दिसून आले की बऱ्याच कुटुंबात 10 वी पर्यंतच शिक्षण घेतले असून त्यानंतर उच्च शिक्षणास स्थगिती आली आहे.

**4) पालकाचे अज्ञान :**

कन्हेरी गावामधील सर्वेक्षणात असे दिसून आले की काही पालक अज्ञानी असून आपल्या पाल्याविषयी जागरूक नाहीत.

**5) निरक्षरता :**

कन्हेरी गावामधील काही लोक अडाणी व निरक्षर असल्याने आपल्या पाल्याबाबत जागरूक असलेले दिसून येत नाहीत.

## कन्हेरी गावातील शैक्षणिक समस्येवर उपाय :

**1)शाळेबाबत आकर्षकता :**

मुलांनी शाळेत यावे, त्यांना शाळेविषयी गोडी वाटावी यासाठी शाळेत वेगवेगळे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. त्यामुळे मुलांची उपस्थिती टिकून राहील.

**2) आर्थिक मदत :**

आर्थिक परिस्थितीमुळे काही मुलांना शाळेत यायला जमत नसेल तर शासनाकडून त्या मुलांसाठी काही योजना आखून त्यांचा सर्व खर्च करणे गरजेचे आहे.

**3) दहावी नंतर शिक्षणाचे मार्गदर्शन केंद्र :**

बहुतेक मुलांना 10 वी झाल्यानंतर पुढे काय करावे हा प्रश्न भेडसावतो. काही मुले शाळा सोडून शेती, मजुरी यासारखे पर्याय निवडतात. अशा मुलांसाठी10 वी नंतर करियर गाईडन्स मिळावा यासाठी मार्गदर्शन केंद्र गावातच उपलब्ध असावे.

**4) शिक्षणाविषयी जनजागृती :**

कन्हेरी या गावातील लोक जास्तीत जास्त 10 वी पर्यंतच शिकलेले असून  या गावात सरकारी नोकरी करणारे लोक अत्यंत कमी प्रमाणात दिसून आले. यासाठी शिक्षणाविषयी जनजागृती करणे गरजेचे आहे.

## गावातील साक्षरता :

### गावातील साक्षरता :

कोणत्याही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी लोकसंख्येचे शिक्षण हा महत्वाचा घटक समजला जातो. स्वत:च्या भाषेत लिहता-वाचता येणे म्हणजेच साक्षर होय. ज्याला कोणत्याही भाषेत पूर्ण क्षमतेने लिहता-वाचता येत नाही त्याला निरक्षर म्हटले जाते. शिक्षण ही सामाजिक बाब समजली जाते. अर्थपूर्ण शिक्षणामुळे व्यक्तींना वैज्ञानिक दृष्टी प्राप्त होते. लोकसंख्येची वाढ रोखण्याची जाणीव होते. व त्यामधून कुटुंब नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी करता येते. लोकसंख्येची आर्थिक व सामाजिक गतीमानता ही तेथील साक्षरतेवर व शैक्षणिक पातळीवर अवलंबून असते. तसेच गावचा विकास हा साक्षरतेवर अवलंबून असतो. म्हणूनच ग्रामसर्वेक्षणात साक्षरता हा घटक घेतला आहे. कन्हेरी या गावात एकूण 73% लोक साक्षर आहेत . यामध्ये पुरूषांचे प्रमाण **51.1%** तर स्त्रीयांचे प्रमाण **48.9%** एवढे आहे.

साक्षरतेचे मापन करण्यासाठी साक्षरता प्रमाण विचारात घेतले जाते. साक्षरता प्रमाण पुढील सुत्राच्या सहाय्याने काढले जाते.

**सूत्र :**

$$\text{साक्षरता प्रमाण} = \frac{\text{एकूण साक्षर व्यक्तींची संख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times 100$$

## प्रकरण चौथे : सर्वेक्षण केलेल्या कन्हेरी गावातील समस्या

1) कन्हेरी गावात शेतीपूरक , शेती व्यवसायाव्यतिरिक्त इतर व्यवसायांचा अभाव आढळून आला.

2) कन्हेरी हे गाव डोंगराळ भागात असल्यामुळे तेथे शेतीसाठी पुरेसे पाणी उपलब्ध नाही. तेथे जलसंधारणाच्या कामाचा अभाव आहे.

3) शेती विकास करण्यासाठी निधी उपलब्ध नाही.

4) शालेय विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना बसची अपुरी सोय आहे.

5) कन्हेरी गावात सांडपाण्याची योग्य व्यवस्था नाही.

6) गावातील युवकांना रोजगार उपलब्ध नाहीत.

7) कन्हेरी गावात सुरक्षित पेयजल सुविधा नाही.

8) गावामध्ये आरोग्य केंद्राची उपलब्धता नाही.

9) कन्हेरी गावात पशुवैद्यकीय सुविधांचा अभाव आहे.

10) गावात दलित वस्ती सुधारण्यासाठी योजना नाही .

11) कन्हेरीमध्ये गावठाणाअंतर्गत रस्ते व गटारांचा अभाव आहे.

12) कन्हेरी गावात वाचनालय / ग्रंथालय यांचा अभाव आहे.

13) शेतीच्या विकासासाठी कृषि केंद्राची उपलब्धता नाही.

14) उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची मोठी कमतरता जाणवते.

## प्रकरण पाचवे : कन्हेरी गावातील समस्येवरील उपाय

1) खडकाळ व नापीक जमीन मोठया प्रमाणावर शेती लागवडीखाली आणणे.
2) शेतीमध्ये ठिबक सिंचनाचा वापर करून पाण्याची कमतरता दूर करता येईल.
3) गावात महिलांसाठी बचत गट स्थापन करून देणे.
4) शैक्षणिक सोई सुविधांचा अधिकाधिक विकास करणे.
5) गावात दलित वस्ती सुधार योजना अंमलात आणणे.
6) गावात शेतीवजा लहान-लहान उद्योगधंदे उभारून रोजगार निर्मिती करणे.
7) शेतीसाठी पाण्याच्या मुबलक सोई उपलब्ध कराव्यात.
8) गावात शासकीय योजनेची अंमलबाजावणी वेळीच करावी
9) गावात प्राथमिक आरोग्य केंद्र व पशुवैद्यकीय दवाखाना उपलब्ध करावा.
10) गावातील सांडपाणी झाडांना किंवा शेतीला वापरावे.
11) गावात तांत्रिक व संगणक शिक्षणाची सोय असावी.
12) गावातील लोकांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी वाचनालयाची सोय करावी.
13) गावात भांडण-तंटा होऊ नये यासाठी प्रयत्न करणे.

**निष्कर्ष :**

कन्हेरी , ता. खंडाळा जि.सातारा या गावचा ग्राम सर्वे केल्यानंतर त्यामध्ये विविध गोष्टींचा अभ्यास करून त्यांचे विश्लेषण करण्यात आले. शैक्षणिक आढावा घेतल्यानंतर काही निष्कर्ष काढण्यात आले. ते निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

1.गावातील 40% लोक मुस्लिम समाजातील, 40% लोक मराठा समाजातील व 20% लोक इतर समाजातील आहेत.

2. बहुसंख्य लोक मराठी भाषिक आहेत .

3. साक्षरतेच्या अभ्यासातून असे दिसून आले की, स्त्री साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

4. गावातील लोकसंख्येवरून असे दिसून आले की,स्त्रियांची संख्या ही पुरुषांच्या संख्येपेक्षा कमी आहे.

5. कन्हेरी गावात बहुसंख्य लोक शेती व मजुरी हेच प्राथमिक व्यवसाय करतात.तर नोकरी करणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे.

6. गावातील सर्वाधिक कुटुंबांचे उत्पन्न 30000 ते 40000 च्या दरम्यान आहे. तर 50000 रु. पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांची संख्या 20 आहे.

7. घरातील सुख सोयीची साधने बहुसंख्य कुटुंबात नाहीत.

8. शासनाच्या धोरणांची अंमलबाजावणी सुरळीतपणे होते.

9. कन्हेरी गावात चांगल्या प्रमाणात शैक्षणिक सोयी सुविधा असून त्याचा तेथील मुलांवर चांगला परिणाम होतो.

10. कन्हेरी गावातील रस्ते, इतर सोयी सुविधा चांगल्या प्रकारच्या आहेत.

**संदर्भ :**


1 आपला सातारा जिल्हा : इंद्रजीत नलपडे , डॉ. शहापूरक , डॉ.शेटे , डॉ.फुले – अभिजीत प्रकाशन , लातूर

2 प्रात्यक्षिक भूगोल : डी.वाय.अहिरराव – सुदर्शन प्रकाशन, नाशिक.

3 कन्हेरी प्रकल्प अहवाल- कन्हेरी विकास कमिटी.

4 Google.Com.

5 Encylopedia of vahagav. Tal-Khandala, Dist-Satara



कन्हेरी गावातील नागरीकांकडून माहिती घेताना महाविद्यालयातील विद्यार्थी



कन्हेरी ग्रामपंचायतीला भेट देताना महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक वृंद



कन्हेरी गावातील नागरीकांकडून माहिती घेताना महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक वृंद




कन्हेरी गावातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रास भेट देताना महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक वृंद